**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ६ मार्च रोजी निबंधस्पर्धेचे आयोजन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यक्रमांतर्गत निबंधस्पर्धेचे आयोजन आठवी ते बारावी शालेय स्तर, यु.जी., पी.जी., पोस्ट पी.जी. वर्गवारीतील विद्यार्थ्यांसाठी दि. ६ मार्च, २०२० रोजी विद्यापीठात करण्यात आले आहे. या संदर्भात सर्व शाळा व महाविद्यालये यांना पत्र पाठवून विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

यावर्षी 'वुमेन इन सायन्स' ही थीम असून ज्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावयाचे आहे, त्यांनी आपले अर्ज विद्यापीठाकडे पाठवावयाचे असून अधिक माहितीकरीता संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक तथा स्पर्धेचे संयोजक डॉ.एस.आर. काळमेघ (९५४५७७०९३९) व सहसंयोजक डॉ. संदीप जोशी (९४२२६७०८६७) यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवरुन संपर्क साधता येईल. तरी स्पर्धेमध्ये जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०४/०३/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी